**नियमित फौजदारी खटला क्र. ३४०/२०१२**

**सरकार वि. विकास घाडगे**

CNR NO - MHSo170020642012

## नि.क्र. ४० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अभियोग पक्षातर्फे आरोपी यांनी दिनांक ३०/०७/२०१२ रोजीचा खरेदी दस्त क्रमांक ४१३१/२०१२ याची मुळ प्रत दाखल करणेबाबत आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहीला.

०३. आरोपी यांनी नि.क्र. ४२ कडे म्हणणे दाखल करुन सदर दस्त त्यांचेकडे नसल्याचे कथन केले आहे. सदर दस्त हा लिहून देणार शिलवंत सौदागर घाडगे व लिहून घेणार वैशाली विकास घाडगे अशा स्वरुपाने नोंदविलेला आहे. कायद्यातील प्रचलित तत्वानुसार सदर दस्ताचा ताबा वैशाली विकास घाडगे यांच्याकडे असणे अपेक्षित आहे. वैशाली विकास घाडगे या सदर प्रकरण प्रलंबित असताना मयत झाले असून वैशाली विकास घाडगे हीचा आरोपी क्र. १ सोबत विवाह झाल्याची बाब वादातील आहे. सदर बाब सिध्द करण्याची अभियोग पक्षाची जबाबदारी आहे. या परिस्थितीत, आरोपी क्र. १ ते ५ कडे सदर दस्ताची मुळ प्रत

असल्याबाबत निष्कर्ष काढता येणार नाही. सदर प्रकरणाच्या तपासादरम्यान तपासिक अधिकारी यांनी मुळ प्रत हस्तगत न करण्याचे कोणतेही कारण अर्जामध्ये नमूद केलेले नाही. या परिस्थितीत, आरोपी क्र. १ ते ५ यांच्या ताब्यामध्येच सदर दस्त असल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर नसल्याने त्यांना सदर दस्त हजर करण्याचे आदेश करता येणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

LAMBE PRATIK GANESH

Digitally signed by LAMBE PRATIK GANESH
Date: 2025.06.18 11:49:37 +0530

( पी. जी. लंबे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
माढा.

दिनांक १७.०६.२०२५

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Oder/Judgment is same word to word, as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri.P.S.Pawar, Grade – 3 |
| Court Name | : | J.M.F.C., Madha. |
| Order / Judgment signed by the Presiding Officer on | : | 17/06/2025 |
| Order / Judgment uploaded on | : | 18/06/2025 |